# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पुणे शहारातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी पोलीस आयुक्तालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याबाबत

**(१) ४५६ (०५-०१-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी पोलीस आयुक्तालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात येणार असल्याचे पुणे पोलिस आयुक्तांनी दिनांक. ३० ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास जाहीर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहर पोलिसांनी शहरातील ज्येष्ठांची नाव नोंदणी करुन ज्येष्ठांना ओळखपत्र देण्याचे काम सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्येष्ठ नागरीकांचे वय ६५ वर्षाऐवजी ६० वर्षे ग्राहय धरण्याबाबत व पुणे पोलिसांमार्फत ग्रामीण भागात ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र कक्ष सुरु करण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१७) :**(१) दिनांक २९/१०/२०१४ रोजीचे गुन्हे विषयक बैठकीमध्ये पोलीस आयुक्त, पुणे शहर व सहपोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पुणे शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र कक्ष सुरु करण्यासंदर्भात चर्चा करुन ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र कक्ष सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या संबंधात पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी जाहिरपणे कोठेही वक्तव्य केलेले नाही. ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र कक्ष पुणे शहर व अथश्री फाऊंडेशनच्या माध्यमातून अथश्री फाऊंडेशनद्वारे www.punejesthanagrik.in वेबसाईट तयार करण्यात आली आहे. तथापी दिनांक ३०.१०.२०१४ रोजीच्या दैनिक लोकमत या वर्तमानपत्रामध्ये ज्येष्ठांसाठी पोलीस आयुक्तालयात स्वंतत्र कक्ष या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली होती.

(२) व (३) ज्येष्ठांची नांव नोंदणी करुन ज्येष्ठांना ओळखपत्र देण्याचे दृष्टीकोनातून पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशन हद्दीतील ज्येष्ठ नागरीकांना विहीत नमुन्यातील फॉर्मचे वाटप करुन त्यांची माहिती संकलीत करण्यात आली आहे. सुमारे २७०० ज्येष्ठ नागरीकांचे फॉर्मस प्राप्त झाले असून ते अथश्री फाऊंडेशनकडे डेटा फिडींगसाठी देण्यात आले आहेत. त्यांचेकडून डेटा फिडींगचे काम चालू आहे. अद्याप ज्येष्ठांना ओळखपत्र देण्याचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील पोलीस खात्याच्या विविध समस्याबाबत**

**(२) २२१६३ (१०-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा पोलीस अधिक्षक, यांचे आस्थापनेवर विविध संवर्गात १८८ पदे निर्माण करण्याचे प्रस्तावित असल्याचे लेखी उत्तर मा.गृह राज्य मंत्री (शहरे) यांनी दिनांक १८ मार्च, २०१४ च्या क्र. कपासू-०५१३/प्रक-८६/पोल-३ अन्वये स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, चंद्रपूर मतदार संघातील पडोली पोलीस चौकीला पोलीस स्टेशनचा दर्जा दिनांक ४ फेब्रुवारी, २०१४ ला गृह विभाग शासन निर्माण क्र. अेपीओ ३१११/प्र.क्र. १०७ (अ)/पुबां २/पोल २/पोल ३ अन्वये देण्यात आला असताना अद्यापही पोलीस स्टेशन दर्जाच्या अनुषंगाने मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले नाही व पोलीस स्टेशन पडोली येथे नवीन इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच , चंद्रपूर शहरात आणि घुग्घुस येथे पोलीस अधिकारी/कर्मचा-यांकरिता २४३ निवासी इमारत मंजूर असून दोन वर्षाचा कालावधी लोटून सुध्दा अद्यापही निवासी इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

राज्य पोलीस दलामधील पदनिर्मितीच्या पहिल्या टप्प्यामध्ये गृह विभाग शासन निर्णय दिनांक ०४.०३.२०१४ अन्वये पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांच्या आस्थापनेवर पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांची १८८ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) उक्त गृह विभाग शासन निर्णय दिनांक ०४.०३.२०१४ अन्वये पडोली पोलीस ठाणेकरीता पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची ६५ पदे मंजूर करण्यात आली आहेत. पडोली पोलीस ठाणे येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव अद्ययावत दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या खर्चाच्या अंदाजासह शासनास फेरसादर करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

(३) व (४) चंद्रपूर शहर येथे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याकरीता ३६४ निवासस्थानांच्या बांधकामाचे काम प्रगती पथावर आहे. घुग्घुस येथील कामासंबंधी उपलब्ध जागा, निवासस्थानांची आवश्यकता व मंजूर संख्या इत्यादीबाबतची माहिती व आवश्यक प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विरार (जि.पालघर) येथील खानिवडे, शिरवली, आडणे, पारोळ, सायवणे, भाताणे , कारजोनण, शिकवार व शिवणसाई या गावामध्ये पोलीस पाटलांची रिक्त असलेली पदे**

**(३) ३४९४३ (०८-०१-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरार (जि.पालघर) येथील खानिवडे, शिरवली, आडणे, पारोळ, सायवणे, भाताणे , कारजोनण, शिकवार व शिवणसाई या गावामध्ये सध्या पोलीस पाटलांची पदे रिक्त असल्यामुळे येथील रहिवाश्यांना अनेक प्रकाराच्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गावांमध्ये सध्या रिक्त असलेल्या पोलीस पाटलांची पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१७) :**(१) विरार, जि.पालघर येथील खानिवडे, शिरवली, आडणे, भाताणे, करंजोण, सकवार व शिवणसाई या गावांमध्ये पोलीस पाटलांची नेमणूक माहे ऑगस्ट, २०१५ पासून करण्यांत आलेली असून सायवन व परोळ या गांवात पोलीस पाटलांची पदे रिक्त आहेत.
(२) सायवन गांवामध्ये रिक्त असलेल्या पोलीस पाटील पद त्वरीत भरण्याबाबत अर्ज मागविले असता, सदर गांवातून कोणत्याही उमेदवाराने अर्ज न केल्याने सदरचे पद रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे.

पारोळ या गांवातील पोलीस पाटील पद भरण्याकरीता अर्ज मागविले असता सदर गांवातून प्राप्त अर्ज प्रचलित नियम व अटीस अनुसरुन नामंजूर झाल्याने त्या गांवातील पोलीस पाटलाचे पद रिक्त आहे. तथापि, नव्याने जाहीरनामा प्रसिध्द करुन रिक्त पदासाठी भरतीप्रक्रिया राबविण्याची तजवीज ठेवली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात दरोडे व इतर विविध गुन्ह्यात वाढ झाल्याबाबत**

**(४) ४१७१४ (२०-०५-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने प्रसिध्द केलेल्या सन २०१४ या अहवालानुसार राज्यात घरफोड्या व इतर गुन्ह्यांत ९० टक्क्यांनी वाढ झाली असून सायबर गुन्हे १०७ टक्क्यांनी हिसांत्मक गुन्ह्यांत ०.७ टक्क्यांनी वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) नागपूर येथे दरोड्याच्या सर्वाधिक ८८५ गुन्ह्याची नोंद झाली तसेच पुणे येथे बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ झाली असून सन २०१४ मध्ये १९८ बलात्काराचे गुन्हे घडले होते तर सन २०१५ मध्ये संख्या वाढून २६४ बलात्काराचे गुन्हे दाखल झाले आहेत, याशिवाय विनयभंगाच्या घटनांमध्ये व इतर गुन्ह्यात वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१७) :**(१) राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने प्रसिध्द केलेल्या सन २०१४ च्या क्राईम इन महाराष्ट्र या अहवालानुसार राज्यात घरफोडी या शिर्षाखाली सन २०१३ व २०१४ मध्ये अनुक्रमे १८३२८ व १७१७१ गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यात ६.३१% घट झाली आहे. सायबर गुन्हे या शिर्षाखाली सन २०१३ व २०१४ मध्ये अनुक्रमे ९०७ व १८७९ गुन्ह्याची नोंद झाली आहे. हिंसात्मक गुन्हे या शिर्षाखाली सन २०१३ व २०१४ मध्ये ३२५५२ अनुक्रमे ३२५७४ गुन्ह्याची नोंद झाली असून त्यात ०.०६% वाढ झाली आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्यात दरोडा या शिर्षाखाली सन २०१३ व २०१४ मध्ये अनुक्रमे एकूण ८३३ व ८८५ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

नागपूर शहरात दरोडा या शिर्षाखाली सन २०१३ व २०१४ मध्ये अनुक्रमे एकूण १५ व १६ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

पुणे शहरात बलात्कार या शिर्षाखाली सन २०१४ मध्ये १८९ गुन्हे घडले असून त्यापैकी १८८ गुन्हे उघडकीस आले आहेत. तसेच सन २०१५ मध्ये बलात्काराचे २६६ गुन्हे दाखल असून २६४ गुन्हे उघडकीस आले आहेत.

सन २०१४ मध्ये विनयभंगाचे ४५४ गुन्हे घडले असून ४४१ उघडकीस आले असून सन २०१५ मध्ये विनयभंगाचे ७०५ गुन्हे दाखल असून त्यापैकी ६८१ गुन्हे उघडकीस आले आहेत.
(३) राज्यातील गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने तसेच त्यास अटकाव करण्याच्या दृष्टीने पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत राज्यातील सर्व पोलीस घटक्रप्रमुखांना आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टिने पोलीस विभागाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत असून त्यावर पोलीस विभागाचे पूर्णपणे नियंत्रण आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी शहरातील बंद पडलेली सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याबाबत**

**(५) ४९२६६ (२०-०५-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरात बसविण्यात आलेल्या ३७ सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांपैकी बसस्थानक, रेल्वेस्थानक, जिंतूर रोड अशा महत्वाच्या ठिकाणाचे सुमारे १६ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी शहरातील मुख्य चौकातील कॅमेरे बंद पडल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला असून शहरात किमान ६० सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची आवश्यकता असल्याची मागणी जिल्हा पोलिस प्रशासनाने दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५ रोजी परभणी जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१७) :**(१) होय.
(२), (३) व (४) परभणी शहरात बसविण्यात आलेल्या कॅमेऱ्यांची वार्षिक देखभाल व नवीन कॅमेरे बसविण्यासाठी पोलीस अधिक्षक, परभणी यांनी दि.१६.९.२०१५ पत्रान्वये जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे दिड कोटी रुपयांची मागणी केली होती. तथापि नियोजन विभागाच्या दि. २७.८.२०१४ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा नियोजन व विकास परिषदेद्वारे जिल्हा विकास निधी व आमदार निधीतून 'नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत' राज्यातील पोलीस दलासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास रु. २५ लक्ष निधीच्या मर्यादेत मान्यता दिलेली होती. त्यानुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे विहीत होणे आवश्यक होते. सदर मार्गदर्शक तत्वे गृह विभाग,शासन निर्णय दि. ९ जानेवारी, २०१७ अन्वये विहित करण्यात आली आहेत. त्यानुसार सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी पोलीस अधीक्षक, परभणी यांना कळवले आहे.

---

**मार्डा घाटात (जि.चंद्रपूर) वर्धा नदीच्या पात्रात उत्खनन केलेल्या खड्ड्यात विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यु झाल्याबाबत**

**(६) ६३६२९ (२३-०८-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मार्डा घाटात (जि.चंद्रपूर) वर्धा नदीच्या पात्रात साई वर्धा पावर, डीएनआर इन्फ्रा इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन कंपनीने उत्खनन करुन खड्डे केले असून या ठिकाणी सुरक्षा रक्षक वा सूचना फलक लावण्यात आले नसल्यामुळे श्रेयस खोब्रागडे या विद्यार्थ्यांचा खड्डयात बुडून मृत्यु झाल्याचे माहे मे २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही कंपन्यांच्या संचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१७) :**(१) सदरची घटना ही दिनांक ०६.०९.२०१५ रोजी घडलेली असून यातील मृतकाचे नाव श्रेयस खोब्रागडे नसून श्रेयस प्रकाश खारोडे असे आहे. याप्रकरणी दिनांक ०७.०९.२०१५ रोजी डॉ.प्रकाश खारोडे यांनी वरोरा पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरुन अकस्मात मृत्यु क्रमांक ५१/२०१५, कलम १७४ जा.फौ.अन्वये गुन्हा दाखल करुन तपास करण्यात आलेला आहे.

(२) व (३) श्री.विनोद खोब्रागडे, रा.वरोरा यांनी दिनांक ०५.१०.२०१५ रोजी मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वरोरा न्यायालय यांचेकडे दिलेल्या अर्जास अनुसरुन मा.न्यायालयाने कलम १५६(३) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दिलेल्या दिनांक १३.०५.२०१६ च्या आदेशान्वये पो.स्टे. वरोरा येथे व्यवस्थापक, मे.साई वर्धा पावर कंपनी, मार्डा व व्यवस्थापक, मे.डि.आर.एन. इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनिअरींग व कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेविरुध्द अप क्र.एम-१/२०१६ कलम ३७९, ३०४(अ), ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मा.न्यायालयाने आरोपींना जामीन मंजूर केल्याने आरोपी जामीनावर आहेत. खाणीसंबंधी कागदपत्रे प्राप्त होणे बाकी असल्याने गुन्हा तपासावर प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात तसेच अहमदनगर येथे पोलीस पाटलांची १६ हजार पदे रिक्त असल्याबाबत**

**(७) ६५२०६ (१६-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच अहमदनगर येथे पोलीस आणि जिल्हा प्रशासनाचा महत्वाचा दुवा ओळखल्या जाणाऱ्या पोलीस पाटलांची १६ हजार पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाला त्यामुळे अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस पाटलांची पदे भरण्याकरीता शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१७) :**(१) राज्यात तसेच अहमदनगर येथे पोलीस पाटलांची सन २०१६ अखेर एकूण १५,२६८ पदे रिक्त आहेत. अहमदनगर जिल्ह्यात एकूण मंजूर पदे १,३५० असून ५८४ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) राज्यातील पोलीस पाटीलांची रिक्त असलेली पदे भरणेबाबत सर्व विभागीय आयुक्तांना सूचना देण्यांत आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील विशेषतः मेहकर येथे पोलिस पाटील भरतीमध्ये झालेला गैरकारभार**

**(८) ६५५०१ (१७-०१-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय सेवा भरती प्रक्रियेत तोंडी परिक्षे दरम्यान होणा-या गैरव्यवहारामुळे मा. पंतप्रधान यांनी तोंडी परिक्षा न घेण्याचे घोषित करुनही सन २०१५ मध्ये झालेल्या पोलिस पाटील भरती दरम्यान तोंडी परिक्षा घेण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील विशेषतः मेहकर तालुक्यातील ब-याच पात्र उमेदवारांना डावलून अंतिम निवड करण्यात आल्याची बाब मा.मुख्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे नोव्हेंबर, २०१५ पासून सातत्याने निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१७) :**(१), (२) व (३) होय.
राज्य शासनाने विहीत केलेल्या शासन निर्णय क्रमांक : बिव्हीपी-०६११/प्र.क्र.४१९/पोल-८, दिनांक २३.०८.२०११ व सुधारीत शासन निर्णय दिनांक २२.०८.२०१४ नुसार विषयाधीन पोलीस पाटील भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. त्यामध्ये कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई व पनवेल (जि.रायगड) येथे बोगस प्रमाणपत्रे बनवून देण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(९) ६५७९४ (०७-०२-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई व पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथे बोगस कागदपत्रांच्या आधारे वाहन परवाना, १० वी व १२ वीची प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला, मृत्युचे दाखले बनवून देण्याच्या प्रमाणात वाढ झाली असून नेरूळ, खारघर व कळंबोली येथून जवळपास ६०० बोगस परवाने, १० वी व १२ वीची प्रमाणपत्रे जप्त केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये बोगस परवाने व शैक्षणिक प्रमाणपत्रे बनवून देत असल्याच्या तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी रबाले पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे १ गुन्हा, कामोठे पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे २ गुन्हे व कळंबोली पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे १ गुन्हा अशा प्रकारे ४ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. सदर चारही गुन्ह्यामध्ये १५ आरोपींना अटक केली असून चारही गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील अविनाश भोसले या बिल्डरने स्वत:च्या ऑफिसची जमीन बेकायदेशीररित्या हस्तांतरीत केल्याबाबत**

**(१०) ६९७५७ (१६-०१-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील रेंजहिल कॉर्नर येथे यशवंत घाडगे नगरात अविनाश भोसले या बिल्डरने स्वत:च्या ऑफिसची जमीन बेकायदेशीररित्या हस्तांतरीत केल्याच्या विरोधात राजेश खरातीलाल बजाज यांनी न्यायालयात दाखल केलेल्या फौजदारी खटल्याच्या निकालानुसार सीआरपीसी १५४ अन्वये अविनाश भोसले व अन्य ६ व्यक्तींविरूध्द चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल झाल्याची बाब दिनांक २ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अविनाश भोसले व इतरांनी शासनाच्या दिनांक १२ जून, १९५१ रोजीच्या निर्णयाच्या अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषींवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे,

सदर प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन, अविनाश भोसले सह इतर ५ जणांविरुध्द चतु:शृंगी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं.३२८/२०१६, भा. द. वि. क्र.४१५, ४२०, ४०६, ४०९ १२० (ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये फिर्यादीने दिलेली फिर्याद खोटी व व्देषबुध्दीने दिलेली असल्याने सदर गुन्ह्याचे तपासी अधिकारी यांनी सदर गुन्ह्याची ब वर्ग समरी मिळणेकामी मा.प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी, न्यायालय क्र.९, शिवाजीनगर, पुणे यांचे न्यायालयात अहवाल सादर केला आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरात ७५३ अपघातात १६० नागरिकांचा मृत्यु झाल्याबाबत**

**(११) ७०५७३ (१७-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात माहे जानेवारी, २०१६ ते जुलै, २०१६ पर्यंत ७५३ अपघातांची नोंद करण्यात आली असून यात १६० नागरिकांचा मृत्यु तसेच ७०६ नागरिक जखमी झाले असून गत साडेतीन वर्षातील एकूण अपघातापैकी सुमारे १६ टक्के मृत्यु या सात महिन्यात झाले असल्याचे दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहरात अपघाताचे वाढते प्रमाण आणि त्यात होणारे निरापराध नागरिकांचा मृत्यु याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-११-२०१७) :**(१) नागपूर शहरात माहे जानेवारी, २०१६ ते जुलै, २०१६ या कालावधीत ७५३ अपघातांची नोंद करण्यांत आली असून त्यात १६६ इसमांचा मृत्यु झालेला आहे तर ८५१ जण जखमी झालेले आहेत.

गत ४ वर्षातील अपघातांची माहिती पुढीलप्रमाणे :-

| सन | अपघात | मृत | जखमी |
|---|---|---|---|
| २०१३ | १२६५ | ३१० | १२३७ |

| | | | |
|---|---|---|---|
| २०१४ | ११४९ | २८१ | १०९४ |
| २०१५ | १२५४ | २६० | १२३३ |
| २०१६ | १३७३ | ३१० | १५१० |

(२) नागपूर शहरातील अपघातांच्या प्रमाणास आळा बसावा याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यांत येत आहेत :-

i) वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांचा वाहन चालविण्याचा परवाना रद्द होण्याबाबत प्रादेशिक परिवहन विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येतात.

ii) शहरातील अपघातांबाबत अभ्यास करुन ब्लॅकस्पॉट (अपघात प्रवण स्थळ) ठरविले असून त्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

iii) झेब्रा क्रॉसिंग, स्टॉपलाईन, डिव्हायडर, नादुरुस्त सिग्नल दुरुस्ती, खड्डे पडलेल्या मार्गाची दुरुस्ती इ. कामांसंदर्भात नागपूर महानगरपालिकेशी पत्रव्यवहार करण्यात आला असून पाठपुरावा करण्यात येत आहे.

iv) अवजड वाहनांना शहरात प्रतिबंध करण्याकरीता दिनांक ०२.०६.२०१६ पासून अधिसूचना निर्गमीत करण्यात आलेली आहे.

v) खाजगी ट्रॅव्हल्स बसेसकरीता शहराचे बाहेर थांबे निर्माण करण्याकरीता निर्णय घेण्याबाबत अध्यक्ष, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

vi) शहरातील शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तसेच खाजगी संस्थेतील कर्मचाऱ्यांना वाहतूक नियमांबाबत जागृती करण्यासाठी स्लाईड शो तसेच विविध कार्यक्रम राबवून जनजागृती करण्यात येते. तसेच जनमानसातसुध्दा वाहतूक नियमांचे पालन करण्याची प्रवृत्ती वाढीस लागण्यासाठी वेळोवेळी शिबिरे आयोजीत करुन दृक-श्राव्य माध्यमांचा वापर करुन जनजागृती करण्यात येत आहे. याकरीता विविध अशासकीय संस्थांची मदत घेण्यात येते.

vii) मद्यपी वाहनचालकांवर विशेष मोहिम राबवून त्यांचे कडक कारवाई करण्याची योजना राबविण्यात येत आहे.

viii) अवैधरित्या प्रवासी वाहतूक तसेच परवाना शर्तींचे उल्लंघन करुन वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कडक कायदेशीर कारवाई करण्यात येते.

ix) दुचाकी वाहनचालकांना हेल्मेट परिधान करण्याविषयी तसेच चारचाकी वाहनचालकांना वाहन चालवितांना सिटबेल्टचा वापर करण्याविषयी जनजागृती करण्यात येते.

x) शाळकरी विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करणारे सायकल रिक्षा, ऑटोरिक्षा, बसचालक यांना लहान मुलांची सुरक्षीत वाहतूक करण्याबाबत प्रशिक्षण देण्याची योजना आहे.

xi) अपघातादरम्यान अपघातग्रस्त व्यक्तीला प्रथमोपचार त्वरित मिळावा व औषधोपचाराची व्यवस्था जलदगतीने व्हावी याकरीता वाहतूक पोलीसांना तज्ञ डॉक्टरांकडून प्रशिक्षण देण्याची योजना राबविण्यात येणार आहे.

नागपूर शहरातील घडणाऱ्या अपघातांवर आळा बसावा याकरीता वाहतूक विभागाकडून बेशिस्त वाहनचालकांवर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे :-

(आकडे रुपये कोटीत)

| सन | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ |
|---|---|---|---|---|
| एकूण केसेस | २,८५,४८५ | २,८१,५८० | ३,५६,८४५ | ५,१५,३७० |
| दंड वसूल (रु.) | ३.६४ | ३.२९ | ४.०५ | ७.९३ |

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात मायक्रो फायनान्स कंपन्याकडून हजारो महिलांची फसवणूक करण्यात आल्याबाबत**

**(१२) ७४००२ (२०-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार महिला बचत गटांना सहा टक्के व्याजदराने पतपुरवठा करणे आवश्यक असताना कर्ज पुरवठ्यापासून महिलांना वंचित ठेवून अल्प पतपुरवठा (मायक्रो फायनान्स) स्थापन करुन त्यामार्फत बचत गटातील महिलांना पतपुरवठा केला जात असून महिला बचत गटांची मायक्रो फायनान्स कंपन्याकडून आर्थिक अडवणूक करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपन्यांना शासनाची मान्यता नसून इतर राज्यात शासनाने अशा कंपन्यांवर बंदी घातलेली असताना महाराष्ट्रात या कंपन्यांवर कोणतीही बंधने घालण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोदिंया, वर्धा, नांदेड यांच्या जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयावर हजारो महिलांनी मोर्चा काढून निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७)** :(१) व (२) सदर प्रकरणी गृह विभागाच्या शासन निर्णय दि.१२.४.२०१७ अन्वये राज्यातील मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या विनातारण कर्जवाटपाबाबत चौकशी करण्यासाठी प्रशासकीय चौकशी समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीकडून माहे डिसेंबर २०१७ पर्यंत अंतिम अहवाल शासनास सादर होणे अपेक्षित आहे.

(३) अंशत: खरे आहे.

जिल्हा चंद्रपूर वगळता नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, नांदेड यांच्या जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयास महिलांनी मोर्चा काढून निवेदन सादर केले आहे.
(४) सदर प्रकरणी वेगवेगळ्या ठिकाणी
खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

अमरावती शहरात ३१० महिलांनी लेखी स्वरुपात १२ तक्रारी दिल्या आहेत.

यवतमाळ जिल्हयात धमकावण्यात आल्याने तीन अदखलपात्र गुन्हे दाखल झाले आहेत.

भंडाराजिल्हयात १ तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे मात्र सदर तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.

अकोला जिल्हयात ३४४ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तथापि मायक्रो फायनान्स कंपन्या राज्य स्तरिय बँकर्स समितीच्या अखत्यारित येत नसल्याने कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

नागपूर जिल्हयात एका गुन्हयात इस्तकासा क्र.१०/१७ कलम१०७, १६६(३) जाफौ अन्वये दि.१३.२.२०१७ रोजी प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे.

अमरावती जिल्हयात तीन अदखलपात्र गुन्हयातील गैरअर्जदारांना समज देण्यात आली आहे.

सदर प्रकरणी राज्यातील लघु वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी संस्थेचा व्यवसाय कायदेशीर रित्या करत असतांना जर कोणी अडथळा करण्याचे प्रकार करत असतील तर अशा अडथळा करणाऱ्या लोकांविरुध्द कायदेशीर कारवाई करावी, तसेच राज्यातील काही लघु वित्तीय संस्था लोकांना दिलेले कर्ज वसुली करत असतांना लोकांना धाकदपटशा करणे, धमक्या देणे, दिलेले कर्ज जबरदस्ती वसुल करणे असे प्रकार करत असतील तर अशा लघु वित्तीय संस्था विरुध्द देखील कायदेशीर कारवाई करावी, अशा सूचना गृह विभाग/पोल-१३ च्या दिनांक १३ एप्रिल २०१७ च्या पत्रान्वये सर्व विभागीय आयुक्तांना दिलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर येथे वाहनाने धडक दिल्याने दोन जणांचा घटनास्थळी मृत्यू झाल्याबाबत**

**(१३) ७४००७ (२०-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर येथे दिनांक २२ जानेवारी २०१७ रोजी मार्निंग वॉक करीत असताना भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनाने धडक दिल्यामूळे दोन जेष्ठ नागरिकांचा घटनास्थळी मृत्यू झाला असून तीन व्यक्ती गंभीर जखमी झाले असल्याची माहिती माहे दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विनाहेल्मेट धारकांना पकडण्यासाठी आणि त्यांच्याकडून चिरीमिरी घेण्यात व्यस्त असलेल्या पोलीस विभागाच्या दुर्लक्षपणामूळेच सदर अपघात घडला असल्याचा नागरिकांत संभ्रम निर्माण झाला असल्यामूळे नागरिकांत मोठ्या प्रमाणात भितीचे व दहशतीचे वातावरण पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१७) :** (१) हे खरे आहे,
फिर्यादीच्या तक्रारीवरुन पो. स्टे. दुर्गापूर येथे दिनांक २२/१/१७ रोजी गु.र.नं..४२/२०१७, भादंवि कलम ३०४, २७९, ३३७, ३३८ मोटार वाहन कायदा १८४, १८५, १३४, १७७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही,

सदरची घटना चारचाकी वाहनाने घडलेली आहे. यात मोटार सायकलचा वापर झालेला नाही.

सन २०१७ मध्ये मोवाका अन्वये खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे दंड आकारण्यात आला आहे.

| **वाहन चालवितांना घडणारे गुन्हे** | **केसेस** | **दंड** |
|---|---|---|
| भरधाव वेगाने | ४६ | ४४००/- |
| दारु पिवून | १६४९ | २०५००/- |
| नो पार्कींग | ६५२ | १११८००/- |
| ओव्हर लोड | १३ | २९१००/- |
| बिना टेल / ब्रेक लाईट | २४१ | ४६६००/- |
| सिट बेल्ट न लावणे | ८९६ | १८३५००/- |
| बिना हेल्मेट | १४० | २२४००/- |
| नंबर प्लेट | १३१४ | २७२१००/- |
| गर्द कांच | ७५ | १५०००/- |
| चुकीच्या साईडने ड्रायव्हिंग | ९६५ | १०३००/- |
| मोबाईलचा वापर | २५ | १०३००/- |

सदर घटनेतील आरोपी ह्यांनी भरधाव वेगाने तसेच निष्काळजीपणे आपले ताब्यातील वाहन चालवून अपघात केल्याने सदरची घटना घडलेली आहे. तसेच सदर घटनेमुळे नागरिकांत कोणत्याही प्रकारचा संभ्रम नसून भितीचे व दहशतीचे वातावरण पसरलेले नाही.
(३) सदर गुन्ह्यात आरोपींना दि.२२/१/२०१७ रोजी अटक करण्यात आली. पोलीस कस्टडी रिमांड करुन तपास करण्यात आला. गुन्ह्यातील आरोपी विरुध्द न्यायालयात दि.१५/४/२०१७ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून त्याचा सि.सी. नं.१७३/२०१७, असा असून सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिवस्मारकासह विविध प्रकल्पांसाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे रुपये चार हजार कोटीची केलेली मागणी**

**(१४) ७४२३६ (२०-०४-२०१७). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने शिवस्मारकासह विविध प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडे रुपये चार हजार कोटीची मागणी माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीत कोणकोणते प्रकल्प समाविष्ट आहेत,
(३) तसेच सदर मागणीच्या पाठपुरावा करण्याकरीता शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला शहरातील पोलीस टोइंग पथकाच्या मनमानी कारभाराबाबत**

**(१५) ७४४०८ (२०-०४-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील वाहतूक शाखेकडून दुचाकी वाहन उचल करण्यापूर्वी त्याचे छायाचित्र काढण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षकांनी टोइंग पथकास दिले असूनही नियमांची पायमल्ली करून टोइंग पथक छायाचित्र न काढता मनमानी पद्धतीने वाहने उचलून नागरिकांना नाहक दंडाची आकारणी करत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला शहरात महानगरपालिकेकडून रस्त्यांच्या कडेला किंवा मधोमध परिवहन विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कोणत्याही रंगाचे किंवा पिवळे पट्टे मारलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१७) :**(१) अकोला शहरातील मुख्य मार्गावरील रहदारीस अडथळा करणारी वाहने तसेच नो-पार्किंग झोनमध्ये वाहतूकीस अडथळा निर्माण करणारी वाहने आढळून आल्यास त्यांना टोईंग पथकाद्वारे दुचाकी वाहन उचलून कार्यवाही करण्यात येते. वाहन उचलून आणण्यापुर्वी त्या वाहनाचे छायाचित्र काढण्यात येत असते.

टोईंग करण्यांत आलेल्या वाहनाचे शहर वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांमार्फत वाहन चालान करुन मोटार वाहन कायद्यातील कलम ११७/१७७ किंवा १२२/१७७ अन्वये टोईंग चार्जेससह दंड वसूल करुन वाहन तात्काळ संबंधीत मालकाचे ताब्यात देण्यात येते.
(२) व (३) अकोला शहरातील मुख्य मार्गांवर तसेच बाजारपेठेमधील ज्या मार्गावर वाहतुकीची कोंडी होते त्या मार्गांवर पिवळे पट्टे मारण्यांत आलेले आहेत. तसेच शहरातील उर्वरित मार्गांवर ज्या ठिकाणी जास्त रहदारी आहे अशा मार्गांची माहिती घेऊन त्या मार्गांवर, नविन रस्त्यांवर परिवहन विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महानगरपालिका, अकोला यांचेकडून पांढरे व पिवळे पट्टे मारण्याचे काम सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गत वर्षभरात सुमारे ११६९ मुले बेपत्त्ता झाल्याबाबत**

**(१६) ७५३१० (२०-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गत वर्षभरात सुमारे ११६९ मुले बेपत्त्ता झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी किती मुलांचा शोध लागला आहे तसेच उर्वरित मुलांचा शोध लावण्याकरिता पोलिस प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१७) :**(१) व (२) सर्व पोलीस घटकाकडून प्राप्त माहितीनुसार सन २०१६ मध्ये एकूण ९७४१ बेपत्ता (अपनयन) गुन्ह्यांची नोद करण्यात आली त्यापैकी ७७३९ इतक्या मुलांचा शोध घेवून पालकांच्या हवाली करण्यात आले.

१) गृह विभाग, शासन परिपत्रक क्र.सीआरटी/०९१२/प्र.क्र.५४/पोल-१३, दि.१०/११/२०१४ अन्वये १८ वर्षाखालील हरविलेल्या व्यक्तींची नोंद थेट अपहरणाचा गुन्हा (एफ. आय. आर.) दाखल करण्यात यावा व सदर गुन्ह्याबाबत योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी. अशा प्रकरणात (FIR) दाखल झाल्यानंतर ४ महिन्यात शोध न लागल्यास प्रकरण संबंधीत अनैतीक मानवी वाहतूक कक्षाकडे वर्ग करण्यात यावा असे आदेश दिले आहेत.

२) हरवलेल्या बालकांच्या तपासाकरीता सुधारित कार्यप्रणाली (SOP) तयार करण्यात आली. त्यानुसार सर्व पोलीस घटक प्रमुखांना कार्यवाही करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

३) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दि.१/७/२०१५ ते ३१/७/२०१५ या कालावधीत हरविलेल्या बालकांना शोधण्यासाठी ऑपरेशन मुस्कान मोहिम राबविण्याच्या सूचनेनुसार ऑपरेशन मुस्कानबाबत व ऑपरेशन स्माईल-२ बाबत गून्हे अन्वेषण विभाग, पाषाण रोड, पूणे येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

हरविलेल्या बालकांना शोधण्यासाठी ४ ऑपरेशन मुस्कान मोहीम राज्यातील ४६ पोलीस घटकामध्ये राबविण्यात येऊन यशस्वीरित्या बालकांचा शोध घेण्यात आला. त्याबाबतचा तक्ता पुढीलप्रमाणे.

| अनु.क्र. | ऑपरेशन मुस्कान | नोंद असलेले मुले/मुली | नोंद नसलेले मुले/मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | जुलै १५ | २८०/५०५ | २५६४/९४७ | ४२९६ |
| २ | जाने. १६ | २९२/३७३ | २६६४/९१५ | ४२४४ |
| ३ | एप्रिल १६ | १४३/३०८ | २३५६/८३४ | ३६४१ |
| ४ | जुन १६ | १७४/३२३ | १८०५/८२७ | ३१२९ |
| | एकूण | ८८९/१५०९ | ९३८९/३५२३ | १५३१० |

४) मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या जनहित याचिका क्र.७५/२०१२ बचपन बचाव आंदोलन विरुध्द भारत सरकार अन्वये देण्यात आलेल्या आदेशाप्रमाणे www.trackthemissingchild.gov.in या संकेतस्थळाची हरविलेल्या बालाकांचा शोध घेण्यासाठी निर्मिती करण्यात आली आहे व त्याबाबतची माहिती सर्व पोलीस घटकांना देण्यात आलेली आहे.

५) प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी हरविलेल्या मुलांचा शोध घेण्याकरीता स्वतंत्र पथक तयार करुन शोध मोहिम राबविणे, जनजागृती करणे, हरविलेल्या व्यक्तींचीमाहिती परिपत्रकामध्ये प्रसिध्द करणे व पालकांच्या संमतीने माहिती वृत्तपत्र व दुरदर्शनवर प्रसिध्द करणे.

६) अनैतिक वाहतूक प्रतिबंध या विषयाबाबत दिनांक ३१/३/२००८ रोजी राज्य गुन्हे अन्वेषण विभागात समन्वय कक्षाची स्थापना करण्यात आली.

७) मुंबई शहर, नागपूर शहर, पुणे शहर, ठाणे शहर, नवी मुंबई, सोलापूर शहर, यवतमाळ, बीड, अहमदनगर, कोल्हापूर, ठाणे ग्रामीण व सांगली या १२ ठिकाणी केंद्र शासन व राज्य शासनाच्या अधिपत्याखाली स्वतंत्र अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत

८) लैंगिक शोषणाच्या विळख्यात अडकलेल्या महिलांची सुटका, पुनर्वसन करण्यासंदर्भातील बाबींचे समन्वय करण्याकरीता मा.अपर मुख्य सचिव, गृह यांचे अध्यक्षतेखाली राज्य सल्लागार समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील गुंजवणी चापेट धरणग्रस्ताची फसवणूक केल्याबाबत

**(१७) ७५६६३ (२०-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील गुंजवणी चापेट प्रकल्पातील धरणग्रस्तांची फसवणूक केल्याच्या गुन्हयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एका व्यक्तीस अटक केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित व्यक्तीवर गुन्हे नोंदविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) चौकशी अधिकारी श्री.सुनिल यादव, पोलीस उप अधीक्षक, एसीबी, पुणे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन १) प्रितम बाळकृष्ण साळुंखे, वरिष्ठ लिपीक, पाटबंधारे विभाग, पुणे, रा.मु.पो. संगमनेर, ता भोर, जि. पुणे २) भगवान विठ्ठल आवाळे, खाजगी इसम रा.मु.पो.भोलावडे, ता. भोर, जि. पुणे यांचे विरुध्द भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर, गुन्हा रजिस्टर नंबर ०५/२०१७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ८, १३(१)(ड) (i) सह १३ (२) प्रमाणे दि. ०३.०१.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयात आरोपी लोकसेवक प्रितम साळुंखे यांना दि. ०३.०१.२०१७ रोजी २२.०० वा. अटक करुन त्यांची दि.०७.०१.१७ रोजीपर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली असून आरोपी भगवान आवाळे यांना दि. ०५.०१.२०१७ रोजी १५.१० वा. अटक करुन त्यांची दि. ०७.०१.२०१७ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली आहे.

आरोपी लोकसेवक प्रितम साळुंखे यांना अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर यांनी दि. ०३.०१.२०१७ रोजी पासून निलंबित केलेले आहे.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील रमाई आवास योजनेंतर्गत घरकूल मंजूर करण्यासाठी उमरगा पालिकचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांना लाच घेताना पकडल्याबाबत**

**(१८) ७७६४० (२१-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील रमाई आवास योजनेंतर्गत घरकूल मंजूर करुन घेऊन पहिल्या हप्त्याचा धनादेश देण्यासाठी रुपये ३,०००/- लाच स्वीकारताना उमरगा नगरपालिकेचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याची माहिती दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीअंती संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :**(१) होय,.

रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर करून घेऊन पहिल्या हप्त्याचा धनादेश देण्यासाठी ३,०००/- रूपयांची लाच स्वीकारल्याने उमरगा नगरपालिकेचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री.मारूती भादुले यांना दि.६.१.२०१७ रोजी अटक करण्यात आली.

(२) व (३) आरोपी लोकसेवकांविरूध्द दिनांक ६.१.२०१७ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीनुसार पोलीस ठाणे, उमरगा, जि.उस्मानाबाद येथे गु.र.क्र. १०/२०१७ दाखल करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी आलोसे भादुले यांच्या विरुध्द अभियोग दाखल करण्यास मान्यता दिली असुन त्यानुसार मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे तसेच जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी आलोसे श्री.भादुले यांना सहायक प्रकल्प अधिकारी पदावरून कायमस्वरूपी कार्यमुक्त केले आहे.

---

**नागपूर शहरात ज्येष्ठ नागरीकांवर होणारे हल्ले रोखण्याबाबत**

**(१९) ७८४०३ (२१-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात गत ५ वर्षात ३६ ज्येष्ठ नागरीकांचा खून, २१२ दरोडे व ४४९ जणांना मारहाण झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ज्येष्ठ नागरीकांवरील हल्ले व खून रोखण्याकरीता त्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देणारा कायदा सन २००७ पासुन अंमलात आणूनही ज्येष्ठ नागरीकांविरुध्दच्या गुन्ह्यात कुठलीही घट झाल्याचे दिसुन आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्येष्ठ नागरीकांवर होणारे हल्ले व खूनासारख्या घटना टाळण्याकरीता शासनाकडुन कोणते कडक कायदे व निर्णय अंमलात आणुन अंमलबजावणी करण्यात येणार आहे तसेच त्याचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.

नागपूर शहरात सन २०१२ ते २०१७ या कालावधीत वेगवेगळ्या कारणास्तव २० ज्येष्ठ नागरिकांचे खून झालेले आहेत. या कालावधीत एकूण ९५ दरोड्याचे गुन्हे घडले असून ज्येष्ठ नागरीकांना मारहाणीबाबतचे एकूण १८ गुन्हे घडले आहेत.

(२) हे खरे नाही.

मुद्दा क्र.१ मध्ये नमूद आकडेवारी पहाता ३६ खुन झालेले नसून वेगवेगळ्या कारणास्तव झालेल्या घटनेत २० खून झालेले आहेत.

(३) पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर अंतर्गत दिनांक २.१२.२००५ पासून ज्येष्ठ नागरीक सहायता कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील प्रत्येक पोलीस स्टेशन मध्ये ज्येष्ठ नागरीक सहायता कक्ष कार्यान्वित आहे. सद्या नागपूर शहर पोलीस आयुक्तालयात ज्येष्ठ नागरीक कक्षात ४७००, ६० वर्षे व ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरीकांची अधिकृत नोंदणी करण्यात आली आहे व त्यांना संबंधित कक्षामार्फत ओळखपत्र देण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरीकांच्या सहायतार्थ २४ तास दुरध्वनी क्र.०७१२-२५६४३३३ कार्यान्वीत करण्यात आला आहे. गुन्हे शाखा व पोलीस स्टेशन कक्षामार्फत रोज १०-१२ ज्येष्ठ नागरीकांच्या घरी भेटी देऊन त्यांच्या अडीअडचणीचे निराकरण केले जात आहे त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरीकांच्या वरिष्ठ अधिकारी समावेत तिमाही बैठकी होऊन चर्चासत्र आणि निराकरणाबाबत सर्व संबंधितांना निर्देश जारी करण्यात येत असतात. ज्येष्ठ नागरीकांचा फोन येताच कक्षातील अधिकारी व कर्मचारी त्यांच्या निवासस्थानी भेट देतात.

सुरक्षिततेच्या दृष्टीने वेळेवेळी योग्य सूचना देण्यात येतात. ज्येष्ठ नागरीकांवरील हल्ले व खुनासारख्या घटना टाळण्याकरीता पोलीस स्टेशन स्तरावर गुप्त कर्मचारी मार्फत तसेच बिट कर्मचारी मार्फत ज्येष्ठ नागरीकांना भेटुन त्यांची समस्या किंवा अडचणी जाणुन घेवून पोलीस स्टेशन स्तरावर त्याचे निवारण करण्यात येते. ज्येष्ठ नागरीक कक्ष बळकट करण्यात

आला असून ज्येष्ठ नागरीकांच्या सुरक्षेसाठी वेळोवेळी वरिष्ठ पातळीवर देखील आढावा घेण्यात येत आहे आणि वेळोवेळी लक्ष वेधण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा डोंगरगाव (ता.गोंडपिंपरी, जि.चंद्रपूर) येथे सातबारा देण्याकरिता लाच मागणाऱ्या तलाठ्यासह एकास अटक करण्यात आल्याबाबत**

**(२०) ८००१८ (२०-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा डोंगरगाव (ता.गोंडपिंपरी, जि.चंद्रपूर) येथे जमिनीची फेरफार करुन सातबारा देण्याकरिता रुपये २ हजारांची लाच मागणा-या तलाठ्यासह एकास दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :**(१), (२) व (३) होय.
आलोसे भिमराव खोब्रागडे तलाठी व खाजगी इसम संजय श्यामराव नामेवार दोघेही राहणार गोंडपिंपरी, चंद्रपुर यांना लाचेची मागणी केल्या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील तरतुदी प्रमाणे अटक केली असून गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

---

**मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील पिडितांना नुकसानभरपाई देण्यात आली नसल्याबाबत**

**(२१) ८००९८ (२१-०४-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील पिडितांना ८ वर्षे उलटली तरी नुकसान भरपाई देण्यात आली नसल्याने याबाबतची सद्यःस्थिती व दोन वर्षापूर्वी आखण्यात आलेल्या धोरणाच्या अंमलबजावणीची सद्यःस्थितीची मा. उच्च न्यायालयाकडून शासनाला विचारणा करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची वस्तुःस्थिती काय आहे तसेच आतापर्यंत किती पिडितांना मदत मिळाली आहे व उर्वरित पिडितांना केव्हापर्यंत मदत मिळण्याचे शासनास अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७)** :(१) हे खरे नाही.
(२) दिनांक २६.११.२००८ रोजी मुंबई शहरात ताज हॉटेल, ओबेरॉय हॉटेल, सी.एस.टी. रेल्वे येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यात एकूण १७५ व्यक्ती मृत पावल्या व २५० व्यक्ती जखमी झाल्या होत्या. मृत १७५ व्यक्तीपैकी ९ व्यक्ती अतिरेकी होत्या त्यामुळे त्यांना मदत अनुज्ञेय नाही तसेच २ मृत व्यक्तीची ओळख पटलेली नाही. उर्वरित १६४ मृत व्यक्तीपैकी ठाणे जिल्हयातील एका मृत व्यक्तीचा वारस तपास लागलेला नाही. उर्वरित १६३ मृत व्यक्तींच्या वारसांना महाराष्ट्र शासनाकडून प्रत्येकी रुपये ५ लक्ष मदत देण्यात आली आहे. १०१ मृत व्यक्तींच्या वारसांना अंत्यविधी करिता प्रत्येकी रुपये १५ हजार मदत देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्रात व इतर राज्यातील ६२ मृत व्यक्तींच्या वारसांना रुपये २५ हजार प्रमाणे अंत्यविधी करिता मदतीचे वाटप केले आहे. तसेच पंतप्रधान कार्यालयाकडून १६३ मृत व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रुपये २ लक्ष मदत करण्यात आली आहे. केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली याचे कडून प्राप्त महाराष्ट्रातील व इतर राज्यातील ८१ मृत व्यक्तींच्या वारसांना रुपये ३ लक्ष प्रमाणे निधीचे जिल्हाधिका-यामार्फत वाटप केल्याचे अभिलेखावरुन दिसून येते तसचे ६ व्यक्तींच्या वारसांचे ३ वर्षासाठी एच.डी. एफ. सी. बँकेत रुपये ३ लक्ष फिक्स डिपॉझिट मध्ये ठेवण्यात आले आहेत. २२ मृत पोलिस, सुरक्षा रक्षक यांच्या वारसांना रुपये २५ लक्ष मदत देण्यात आली आहे.

सदर दुर्घटनेत २५० व्यक्ती जखमी झाल्या होत्या त्यापैकी ३ व्यक्ती किरकोळ जखमी होत्या. ३ किरकोळ जखमी व्यक्तींना प्रत्येकी रुपये ५ हजार मदत देण्यात आली. ५ परदेशी जखमी व्यक्तींनी मदत घेण्यास नकार दिला तसेच १ जखमी आतंकवादी असल्याने मदत देण्यात आली नाही. उर्वरित २४१ व्यक्तींना प्रत्येकी रुपये ५० हजार मदतीचे वाटप करण्यात आले आहे. पंतप्रधान कार्यालयाकडून २४१ जखमींना प्रत्येकी रुपये १ लक्ष निधीचे वाटप केले आहे. सदर हल्ल्यात २ व्यक्तींना कायम अपंगत्व आल्याने केंद्रीय गृह मंत्रालयाकडून रुपये ३ लक्ष मदत देण्यात आली आहे. मदत देण्याच्या उर्वरित प्रकरणात इतर देशाचे दुतावास व इतर राज्यातील जिल्हाधिकारी यांच्या कडून प्रस्ताव प्राप्त होताच जिल्हाधिकारी यांच्या मार्फत प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्हयातील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील शासकीय नोक-यांमधील आरक्षण कमी केल्याबाबत

**(२२) ८२४९१ (२१-०४-२०१७). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील नागरिकांना देण्यात आलेल्या १९ टक्के आरक्षणापैकी यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयामध्ये शासकीय नोकऱ्यांमध्ये दिनांक १ सप्टेंबर, १९९७ पासून ११ टक्के करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्हयात हेच प्रमाण दिनांक २५ ऑक्टोंबर, २००२ पासून ६ टक्के करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात इतर मागासप्रवर्गाचे लोकसंख्येंचे प्रमाण ६० टक्के आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, इतर मागासप्रवर्गाचे आरक्षण वाढविण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७)** :(१) होय.
(२) होय.
(३) जणगणनेनुसार गडचिरोली जिल्हयाची अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या उपलब्ध आहे, इतर मागासवर्गाची , तसेच विजाअ,ब,क,ड यांची स्वतंत्र अशी लोकसंख्येची आकडेवारी उपलब्ध नाही.
(४) व (५) अनुसूचित जमातीची लोकसंख्या अधिक असलेल्या म्हणजेच आदिवासी बहुल जिल्हयांमध्ये अनुसूचित जमातीसाठी केवळ सरळसेवेमध्ये गट-क व गट-ड च्या पदांवर नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र राज्य लोकसेवा [अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण] अधिनियम, २००१ मधील कलम ४ (२) (दोन) स्पष्टीकरण दोन मधील परंतुकान्वये वाढीव आरक्षण विहित केले असून, कायदयातील तरतूदीनुसार गडचिरोली जिल्हयासाठी २४% आरक्षण विहित केले आहे. त्यामागे उद्देश असा होता की, गडचिरोली जिल्हा हा नक्षलग्रस्त जिल्हा असून, या जिल्हयातील अनुसूचित जमातीमधील आदिवासी घटक या जिल्हयाच्या दुर्गम व नक्षलग्रस्तांचा प्रभाव असलेल्या भागात वास्तव्य करीत आहेत. त्यांचेवर नक्षलवादी प्रभाव टाकून त्यांना त्यांच्या कारवाईत सामील करुन घेतात. आदिवासी समाजातील स्थानिक लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिल्यास ते राज्याच्या मुख्य प्रवाहात येऊ शकतील. याकरिता आदिवासी बहुल जिल्हयामध्ये अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण ठेवण्याचे शासनाचे धोरण आहे.

एकूण आरक्षण ५२% च्या मर्यादेत ठेवण्यासाठी इतर काही मागास प्रवर्गाचे आरक्षण कमी केले आहे त्यामध्ये इतर मागासवर्गीयांचा सुध्दा समावेश आहे. या घटकाचे साधारणत: गडचिरोली जिल्हयाच्या विकसित भागात वास्तव्य असून, या भागामध्ये नक्षलग्रस्तांचा उपद्रव मोठया प्रमाणात नाही. सदर मागास घटक हे खुल्या प्रवर्गाकरीता उपलब्ध असलेल्या ४८% पदांसाठीही स्पर्धा करु शकतात.

तसेच गडचिरोली जिल्हयाकरिता गट-अ व गट-ब मधील पदांसाठी सरळसेवेत इतर मागासवर्गीयांकरिता १९% आरक्षण कायम आहे. त्यामुळे त्या संवर्गातील पदांकरिता इतर मागासवर्गातील उमेदवारांसाठी संधी उपलब्ध आहेत.

---

## नांदुर नाका (जि.नाशिक) येथे असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकत असलेला विद्यार्थ्याचा शाळेच्या बस मधून पडून झालेला मृत्यू

**(२३) ८२७५६ (२०-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नांदूर नाका (जि.नाशिक) येथे जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी शाळेच्या बसमधून पडून मृत झाल्याची घटना दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अपघातास जबाबदार असणाऱ्या शाळा प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-११-२०१७) :**(१) दिनांक ९ फेब्रुवारी, २०१७ रोजी नाशिक महानगरपालिका क्षेत्रात पंचवटी येथील खाजगी मान्यताप्राप्त शाळेतील पुर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्याचा (वय वर्षे ४) तो प्रवास करीत असलेल्या खाजगी व्हॅनचा दरवाजा अचानक ब्रेक दाबल्याने उघडला गेल्याने व्हॅनच्या बाहेर पडून त्याचा उपचारादरम्यान हॉस्पिटलमध्ये मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) शाळेने व्हॅनमालक यास सुरक्षा व वाहतुक नियमांचे काटेकोर पालन करुन विद्यार्थ्यांना ने-आण करण्यासाठी परवानगी दिलेली होती. सदर परवानगीस अनुसरुन तसेच आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करुन प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांचेकडून शाळेच्या विद्यार्थ्यांची ने-आण करण्याचे परमिट प्राप्त करण्यात आले होते.

आरोपी वाहनचालकाने हयगयीने व अविचाराने वाहन चालवून विद्यार्थ्याच्या मृत्युस कारणीभूत झाल्याने त्याचेविरुध्द उपरोक्त अपघातप्रकरणी आडगांव पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ५१/२०१७, भा.दं.वि. कलम ३०४ अ, २७९, ३३७, ३३८, ४२७ व मो.वा.का. १८४ नुसार दिनांक ०९.०२.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस तात्काळ अटक करण्यात आली असून आरोपीस मा.न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दिनांक ०४.०४.२०१७ रोजी क्र.२५/२०१७ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले असून गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग यांनी शहरातील सर्व माध्यमाच्या व व्यवस्थापनांच्या शाळांची बैठक घेऊन परिवहन समितीच्या सक्षमतेबाबत तसेच शाळेतील विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खाजगी तसेच स्वत:च्या मालकीच्या सर्व प्रकारच्या वाहनांची तपासणी करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशी तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) पारडी फाट्यावर कर्जमाफीची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांवर करण्यात आलेला लाठीचार्ज**

**(२४) ८५३१९ (०४-०९-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील वाशी तालुक्यातील पारडी फाट्याजवळ शेततळ्याची पाहणी करण्यासाठी गेलेल्या मा.मुख्यमंत्र्यांकडे कर्जमाफीची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांवर दिनांक १३ मे, २०१७ रोजी लाठीचार्ज करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) एका राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी या कारणावरून, काळे झेंडे दाखवून निषेध करत असतांना पोलीसांनी त्यांना ताब्यात घेतले. याबाबत त्यांच्यावर पोलीस स्टेशन वाशी येथे गु.र.नं. १०९/२०१७ म.पो.का. कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने अति महत्वाच्या व्यक्तींसाठी हवाई प्रवासाकरीता भाडे तत्वावर हेलिकॉप्टर घेण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(२५) ८६२५३ (०४-०९-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने अति महत्वाच्या व्यक्तींसाठी हवाई प्रवासाकरीता भाडे तत्वावर हेलिकॉप्टर घेण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑगस्टा वेस्टलॅण्ड या कंपनीची हेलिकॉप्टर भाडे तत्वावर घेण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीवर सन २०१४ मध्ये तत्कालीन कॉंग्रेसप्रणीत युपीए सरकारने बंदी घालण्याची प्रक्रिया सुरु केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अति महत्वाच्या व्यक्तींसाठी हवाई प्रवासाकरीता भाडे तत्वावर हेलिकॉप्टर घेण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७)** :(१) होय.
(२) अंशत: खरे आहे, राज्यातील अतिमहत्वाच्या हवाई प्रवासाकरीता भाडयाने हेलिकॉप्टर घेण्याबाबत निविदा प्रक्रियेद्वारे मे. ॲडोनीस एव्हीएशन व ॲलॉफ्ट एव्हीएशन या २ संस्थांच्या ९ हेलिकॉप्टरची निवड यादी मंजूर केली असून प्रत्येक वेळी आसन क्षमतेची गरज विचारात घेऊन ९ हेलिकॉप्टरपैकी आवश्यक व उपलब्ध ते हेलिकॉप्टर भाडयाने घेण्यात येते.
(३) प्रस्तुत विषय हा केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.
(४) राज्यातील अतिमहत्वाच्या हवाई प्रवासाकरीता भाडयाने हेलिकॉप्टर घेण्यासाठी एकूण २ संस्थांच्या ९ हेलिकॉप्टरची निवड यादी मंजूर केली असून प्रत्येक वेळी आसन क्षमतेची गरज विचारात घेऊन ९ हेलिकॉप्टरपैकी आवश्यक ते हेलिकॉप्टर भाडयाने घेण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्यात एक स्वतंत्र सायबर सेल स्थापन करण्याबाबत

**(२६) ८७८९७ (०४-०९-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात संघटीत गुन्हेगारीचे प्रमाण वाढवणाऱ्या सायबर क्राईमला रोखण्यासाठी शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्यात एक स्वतंत्र सायबर सेल स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१७)** :(१) महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात जिल्हानिहाय/घटकनिहाय ४७ सायबर लॅब स्थापन करण्यात आल्या आहेत.
(२) राज्यातील सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण व त्यामुळे जनमानसावर होणारा परिणाम पाहता राज्य शासन व पोलीस यंत्रणेमध्ये सायबर गुन्ह्यांचे संदर्भात अधिक परिणामकारक सुसुत्रता स्थापन आणण्याकरिता व गुन्ह्यांचा शोध घेण्यामध्ये समन्वय आणण्यासाठी मुंबई येथे महाराष्ट्र सायबर हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक हे सदर कक्षाचे प्रमुख तसेच नियंत्रक अधिकारी आहेत. व या कार्यालयात सायबर गुन्ह्यांचा तपास, अन्वेषण, त्याबाबतची सांख्यिकी, करावयाच्या उपाययोजना तसेच संबंधित इतर माहिती इ. बाबींचे कामकाज पाहिले जाते.
महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात ४७ सायबर लॅब स्थापन करण्यात आल्या आहेत. या सायबर लॅब्सना पोलीस ठाणेचा दर्जा देण्यात आला आहे. तसेच सदर सायबर लॅब्समध्ये अत्याधुनिक तपास यंत्रे, साधनसामुग्री तसेच इतर कार्यालयीन उपकरणे यांची खरेदी व पुरवठा प्रक्रिया सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परतवाडा (जि.अमरावती) तालुक्यात प्रशासनाच्या चुकीच्या कारवाईचा बळी ठरलेले रामापूर बे.शाळेतील जि.प.शिक्षक यांच्या दोषींवर कारवाई करण्याबाबत**

**(२७) ८८०३६ (०४-०९-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतवाडा (जि.अमरावती) तालुक्यात प्रशासनाच्या चुकीच्या कारवाईचा बळी ठरलेले रामापूर बे.शाळेतील जि.प.शिक्षक अरुण वाटाणे यांच्या नातेवाईकांनी दिनांक ८ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास प्रशासकीय अधिका-यांच्या विरोधात सरमपुरा पोलिस स्टेशनमध्ये लेखी स्वरुपात तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रशासकीय अधिका-याविरोधात पुरावे सादर करुनही पोलिस त्यांचेवर का कारवाई करीत नाही, असा सवाल अचलपूर तालुक्यातील ५५० शिक्षकांसह मृतक यांचे नातेवाईक विचारीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१७) :**(१) परतवाडा (जि.अमरावती) तालुक्यात प्रशासनाच्या चुकीचा बळी ठरलेले रामापूर बे. शाळेतील जि.प. शिक्षक अरूण वाटाणे यांच्या नातेवाईकांनी दिनांक ७ मे, २०१७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अचलपूर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. अमरावती व इतर यांच्या विरोधात पोलीस स्टेशन, सरमपूरा येथे लेखी स्वरूपात तक्रार अर्ज दिला आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणाच्या चौकशीमध्ये मृतक श्री.अरूण वाटाणे, सहायक शिक्षक यांचा मृत्यू प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या मानसिक त्रासाने झाला नसून मृतकास पुर्वी पासून हायपरटेंशन व पॅरालीसीसचा आजार होता, तसेच पोटाचे आतड्यामध्ये छिद्र पडल्यामुळे त्यांची प्रकृती खालावत जावून मरण पावल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मृतक श्री. अरूण वाटाणे यांच्या गैरवर्तणुकीसंदर्भात नियमानुसार कार्यवाही केल्याचे दिसून आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**पिंपरीतील (जि.पुणे) किवळे येथील ढवळे पेट्रोल पंम्पावर काम करणा-या कर्मचा-यांवर १० ते १२ जणांच्या टोळक्याने कोयत्याने वार केल्याबाबत**

**(२८) ८८१४१ (०४-०९-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरीतील (जि.पुणे) किवळे येथील ढवळे पेट्रोल पंम्पावर काम करणा-या कर्मचा-यांवर एका टोळक्याने कोयत्याने वार केले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार हल्लेखोरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१७)** :(१), (२) व (३) दि.२४/४/२०१७ रोजी श्री सिद्धीविनायक पेट्रोलपंपाच्या ऑफीसचे शेजारी, मुंबई बँगलोर हायवे पुनावळे, ता.मुळशी, जि.पुणे येथे घडली आहे. पेट्रोल पंपवर काम करणारा कर्मचारी व इतर चार इसम यांच्यात त्याच दिवशी दुपारी झालेल्या भांडणातून घडलेली आहे. सदर घटनेत पेट्रोलपंप कर्मचाऱ्यास सत्तूरने वार करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला गेला.

सदर घटनेबाबत जखमीच्या मित्राने हिंजवडी पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारीनुसार गु.र.नं.१९३/२०१७ भा.दं.वि. कलम ३०७, ३२३, ५०४, ५०६ व आर्म ॲक्ट ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याच्या तपासात चार आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून तीन सत्तूर, कपडे व दोन दुचाकी वाहने जप्त केली आहेत. गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी शिवाजीनगर, पुणे यांचे न्यायालयात आरसीसी क्र.३९१५/२०१७ अन्वये, दि.१८/७/२०१७ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे येथील खेळाडू कोटयातून नोकरी मिळविणा-या आरोग्य सेवकाला कामावरुन कमी करण्याची धमकी देऊन ३ लाख रुपयाची लाच घेतल्याबाबत

**(२९) ८८६०१ (०४-०९-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील खेळाडू कोट्यातून नोकरी मिळविणा-या आरोग्य सेवकाला कामावरुन कमी करण्याची धमकी देऊन ३ लाख रुपयांची लाच घेणा-या ठाण्याच्या महिला हिवताप अधिकाऱ्यासह वरिष्ठ लिपिकास लाचलूचपत प्रतिबंध विभागाने दिनांक ९ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाचलूचपत प्रतिबंध विभागामार्फत या दोन्हीही आरोपींच्या मालमत्तेची चौकशी सुरु असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७)** :(१) होय.

(२), (३) व (४) दोन्ही आरोपी लोकसेवकांच्या घरझडती मध्ये प्राप्त मालमत्ता घेण्यास सदर लोकसेवक सक्षम असल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाल्याने त्यांच्या मालमत्तेची चौकशी सुरू करण्यात आलेली नाही.

आरोपी लोकसेवक लाच स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले असल्याने त्यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक काद्ययातील तरतुदीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन याबाबतचा पुढील तपास सुरू आहे. याशिवाय आरोपी लोकसेवकांना निलंबित करण्यात आले आहेत.

---

**विटा (जि.सांगली) येथील सुमारे ३५ यंत्रमागधारकांची पाच कोटी रुपयांची फसवणूक केल्याबाबत**

**(३०) ८८६४२ (०४-०९-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा (जि.सांगली) येथील सुमारे ३५ यंत्रमागधारकांची पाच कोटींची फसवणूक केल्याचा प्रकार माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी विटा पोलिस ठाणेमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत याप्रकरणी किती जणांना अटक केली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७)** :(१) दि.२६/०२/२०१७ ते दि.१९/०४/२०१७ या कालावधीत २ आरोपींनी फिर्यादी व इतर ९८ जणांची सुमारे ३,९३,९१,६१५/- रुपयांची फसवणूक केली आहे

(२) व (३) होय.

सदर प्रकरणी वीटा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ११४/२०१७ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ प्रमाणे दि.२०/०४/२०१७ रोजी ३ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्यात आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध घेण्यात येत आहे. आरोपीस अटक करण्यावर गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**ठाणे ग्रामीण पोलिसांच्या भिवंडी तालुका पोलीस ठाण्यातील हवालदाराने लाच घेतल्याचे प्रकरण**

**(३१) ८८७०१ (०४-०९-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे ग्रामीण पोलिसांच्या भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या हवालदार शशिकांत पाटील यांच्या विरोधात लाच घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर हवालदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :**(१), (२), (३) व (४) होय,

आरोपी लोकसेवक शशिकांत पाटील, हवालदार, भिवंडी तालुका, पोलीस स्टेशन, जिल्हा- ठाणे ग्रामीण, यांनी तक्रारदार यांना मदत करण्यासाठी लाच स्विकारण्याची निष्पन्न झाल्याने त्यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील तरतुदिनुसार दिनांक ०३ मे, २०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आलोसे पाटील यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

**बनावट एटीएम कार्डने एटीएम मशीनमधून रक्कम काढल्याबाबत**

**(३२) ८८७०५ (०४-०९-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर मध्यवर्ती पोलीस स्टेशनच्या हद्दीत ॲक्सीस बँकेच्या एटीएम मशीनमधून बनावट एटीएम कार्डाच्या सहायाने ४०,००० रू. ची रक्कम श्री राहूल अटांगळे यांच्या खात्यातून काढल्याची घटना दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त फसवणुकीबाबत तपास लावून गुन्हेगारास अटक करण्यास पोलीस यंत्रणेस अद्याप यश आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास अशा प्रकारच्या अनेक घटना राज्यभर अनेक बँकांच्या एटीएम मधून घडत असतांना त्या घटनांच्याही तपासात पोलीस यंत्रणेस पूर्णपणे अपयश आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.पंतप्रधान महोदय यांच्या कॅशलेस इंडिया या संकल्पनेस, अविश्वसनीय ठरविणाऱ्या या गुन्हेगारीच्या प्रकारांना आळा घालण्याकरीता शासनस्तरावरून कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१७) :**(१) सदरची घटना दि.३१.०३.२०१७ रोजी घडलेली असल्याबाबत फिर्यादी श्री.राहुल मोहनराव अडांगळे यांनी दि.०६.०४.२०१७ रोजी तक्रार अर्ज दिल्याने सदरबाबत मध्यवर्ती पोलीस ठाणे, उल्हासनगर येथे दि.२१.०४.२०१७ रोजी गुन्हा नोंद क्र. २०/२०१७ कलम ६६ (सी), ६६ (डी) आय.टी. ॲक्ट अन्वये दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर गुन्ह्याचा तपास चालू असून गुन्हयातील अज्ञात इसमाने पटना, बिहार राज्य येथील ए. टी. एम. मधून डमी कार्ड वापरून सदरची रक्कम काढल्याचे तपासात निष्पन्न झाले असून त्या अज्ञात इसमाचा पोलीसांकडून शोध घेण्यात येत आहे.
(३) अशा प्रकारचे राज्यामध्ये एकूण २१ गुन्हे नोंद आहेत. त्यातील ५ गुन्हे उघडकीस आले असून २० आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित गुन्हयांचा तपास पोलीस करीत आहेत.
(४) राज्यात वाढलेल्या सायबर गुन्ह्यांना आळा बसविण्याकरिता महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प राबविण्यात येत असून राज्यात होणा-या सायबर गुन्ह्यांच्या तपासावर देखरेख करणे याकरीता विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र सायबर यांचे नियंत्रणाखाली स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.सदर प्रकल्पांतर्गत पुढील पाच वर्षांमध्ये राज्य पोलीस यंत्रणा सायबर गुन्ह्यांची उकल करण्याकरिता सुसज्ज करण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत राज्यातील सर्व जिल्हे व पोलीस आयुक्तालयांमध्ये मिळून ४७ सायबर लॅब सुरू करण्यात आल्या आहेत. सदर सायबर लॅबना सायबर पोलीस ठाणे म्हणून घोषित करण्यात आले असून पोलीस ठाणे कार्यन्वित करणे व त्या पोलीस ठाणे येथे मनुष्यबळ पुरविण्याचे काम चालू आहे. तसेच सायबर लॅब पोलीस ठाणे यांना तपासाकरिता आधुनिक यंत्रसामुग्री (सॉफ्टवेअर व हार्डवेअर) पुरविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील तहसिल कार्यालयातील पुरवठा निरिक्षण अधिकाऱ्यास लाच स्वीकारताना पकडल्याबाबत**

**(३३) ८८७४७ (०७-०७-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील तहसिल कार्यालयात नवीन शिधापत्रिका काढण्यासाठी रूपये १२ हजाराची लाच स्विकारताना पुरवठा निरिक्षण अधिकारीसह चार व्यक्तींना लाचलूचपत प्रतिबंध विभागाने दिनांक ०९ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास पकडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच उक्त प्रकरणात ग्रामीण पुरवठा कार्यालयातील तिघा अधिकाऱ्यांसह एका दलालसही लाचलूचपत प्रतिबंध विभागाने अटक केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१७) :**(१) व (२) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने भिवंडी तहसिल कार्यालयातील पुरवठा निरीक्षण अधिकारी,पुरवठा अव्वल कारकुन व लिपिक अशा तीन लोकसेवकांना दि.०८/०६/२०१७ रोजी लाच स्वीकारताना रंगेहात पकडले आहे. तथापि, या प्रकरणी कोणत्याही दलालास अटक केलेली नाही.

(३) व (४) सदर प्रकरणात तीनही आरोपी लोकसेवकांविरूद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे.तसेच सदर लोकसेवकांना निलंबित करण्यात आले आहे

---

## नाशिक विमानतळावरून प्रवाशी विमानसेवा सुरु करण्याबाबत

**(३४) ८९१७१ (०४-०९-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विमानतळाची माहे मार्च, २०१४ पासून सुसज्ज इमारत तयार असूनही माहे जून २०१७ पर्यंत सदर विमानतळावरून प्रवाशी विमानसेवा सुरु झालेली नाही , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय विमान वाहतूक धोरणातील रिजनल कनेक्टीव्हिटी स्किम मध्ये नाशिकचा समावेश असूनही सदर विमानतळावरून प्रवाशी विमानसेवा सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर विमानतळावरून प्रवाशी वाहतूक सेवा सुरु करण्यासाठी शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७) :**(१), (२) व (३) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय विमान वाहतूक धोरणांतर्गत राबविण्यात येत असलेल्या Regional Connectivity Scheme (RCS) या योजनेंतर्गत महाराष्ट्रात नाशिक-ओझर येथील विमानतळाचा समावेश आहे. या योजनेंतर्गत राज्य शासनाकडून विमानतळांना विविध सोयी-सवलती पुरविण्यात येणार आहेत. एचएएल, नाशिक यांचेकडे विमान उड्डाणसाठी आवश्यक असलेल्या सर्व तांत्रिक मान्यता आहेत. तसेच विमानतळाची इमारतही सुसज्ज आहे. सद्यस्थितीत विमानतळाची सुसज्ज इमारत राज्य शासनाकडून एचएएल, नाशिक यांचेकडे हस्तांतरीत करण्यासाठी भाडेकरार करण्याची कार्यवाही सुरु असून सदर विमानतळावरून प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरु करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगाव (जि. नाशिक) तालुक्यातील नवीन शर्तीच्या शेतजमिनी खरेदी विक्रीत झालेला गैरव्यवहार

**(३५) ८९३७४ (०४-०९-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील नवीन शर्तीच्या शेतजमिनी खरेदी विक्रीत अपर जिल्हाधिकारी यांच्याकडूनच कायदेशिर तरतुदींचा भंग झाल्याने अपर जिल्हाधिकारी यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास कारवाई करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :**(१), (२) व (३) नांदगांव तालुक्यातील नवीन शर्तीच्या शेतजमिनी खरेदी विक्रीत अपर जिल्हाधिकारी यांच्यावर लाचलुचपत विभागाने दिनांक ११ एप्रिल २०१७ रोजी वा त्यासुमारास कारवाई केली नसून सन २०१५ मध्ये जमिनीचा व्यवहार नियमीत करुन देण्यासाठी तत्कालीन अपर जिल्हाधिकारी यांनी खाजगी इसमाच्या मध्यस्तीने लाच स्विकारण्याचे मान्य केल्याने भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ च्या तरतुदी नुसार त्यांच्यावर गुन्हा दाखल केला असून दिनांक ०६.०८.२०१५ रोजी त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणाची तपास पुर्ण झाला असून दिनांक १०.०१.१७ रोजी मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

---

**मीरा भाईंदर शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय व ठाणे जिल्ह्यातील दिवा (स्टेशन) शहराकरिता नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत**

**(३६) ९०००७ (०४-०९-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा भाईंदर शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्र्यांनी दिनांक १४ जून, २०१७ रोजी केली, हे खरे आहे काय,
(२) तसेच, ठाणे जिल्ह्यातील दिवा (स्टेशन) शहराकरिता नवीन पोलीस ठाणे तयार करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मागील दोन वर्षांपासून होत आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, मीरा- भाईंदर पोलीस आयुक्तालय व दिवा पोलीस स्थानकाची निर्मिती करण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-११-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

राज्य पोलीस दलामधील पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर केला आहे. सदर पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांच्या आस्थापनेवर दिवा पोलीस ठाणे निर्माण करण्याची बाब प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला असता त्यावर वित्त विभागाने त्यांच्या दिनांक २५.०५.२०१७ च्या शासन निर्णयानुसार पोलीस दलाचा आकृतीबंध निश्चित करुन प्रस्ताव फेरसादर करावा असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंद्रुप (ता.दक्षिण सोलापूर) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधिल हेअर ॲन्ड स्किन केअर या व्यवसाय अभ्यासक्रमाबाबत**

**(३७) ९०१४७ (०४-०९-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मंद्रुप (ता. दक्षिण सोलापूर) या संस्थेमध्ये हेअर ॲन्ड स्किन केअर हा सुरु असलेला व्यवसाय अभ्यासक्रम बंद करण्यात येऊ नये यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जून २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.कौशल्य विकास मंत्री, यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थेमधील उक्त अभ्यासक्रम बंद करण्यात येऊ नये यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१७-१०-२०१७) :**(१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मंद्रूप येथील बेसिक कॉस्मेटॉलॉजी (जुने नाव हेअर ॲण्ड स्कीन केअर) हा सुरू असलेला व्यवसाय अभ्यासक्रम बंद करण्यात येऊ नये याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि, दि. १५/६/२०१७ रोजी मा.लोकप्रतिनिधींनी सादर केलेल्या निवेदनामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर (मुलींची) येथील हेअर ॲण्ड स्कीन केअर हा सुरू असलेला व्यवसाय अभ्यासक्रम बंद न करता औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मंद्रुप, ता.दक्षिण सोलापूर येथील अभ्यासक्रम सोलापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण, संस्था, सोलापूर (मुलींची) येथे वर्ग करून प्रवेश प्रक्रिया सुरू करणेबाबत अथवा सोलापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर (मुलींची) येथे तात्काळ पद मंजूर करून सदर अभ्यासक्रम नियमित करणेबाबत विनंती केलेली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर विमानतळाजवळ सुमारे ६०० एकर जमीन रामदेव बाबा यांच्या पतंजली फुड पार्कसाठी नाममात्र किंमतीला दिल्याबाबत**

**(३८) ९०९७६ (१८-०८-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अनिल कदम (निफाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) योगगुरु रामदेव बाबा यांच्या पतंजली आयुर्वेद कंपनीला फूड पार्क उभारण्यासाठी राज्य शासनाने नागपूर विमानतळाजवळ सुमारे ६०० एकर जमीन सवलतीच्या दराने दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात जमीन हस्तांतरण प्रक्रियेत संशयास्पद व्यवहार झाल्याने मा.मुख्यमंत्री यांनी हस्तक्षेप केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१७) :**(१) पतंजली उद्योग समुहाला सेझ (विशेष आर्थिक क्षेत्र) मध्ये १०६.११ एकर तर सेझ बाहेरील क्षेत्रामध्ये २३४.१५ एकर अशी एकूण ३४०.२६ एकर जागा देण्यात आली आहे. विशेष आर्थिक क्षेत्रातील विकसित भूखंड हे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या बोर्डाने मंजूर केलेल्या नियोजित दराने देण्यात येतात. त्यानुसार, पतंजली उद्योग समूहाला सेझ मधील भूखंड देण्यात आलेला आहे. सेझ बाहेरील क्षेत्रातील भूखंड हे ई-निविदा पध्दतीने देण्यात येतात. त्यानुसार जून, २०१६ मध्ये ई-निविदा काढण्यात आली. मात्र २ वेळा निविदा काढूनही अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे तिसऱ्यावेळी आलेल्या प्रतिसादानुसार पतंजली उद्योग समुहाला सदरहू भूखंड वितरीत करण्यात आला.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथे माजी नगरसेवक नामदेवराव भुइटे यांच्या खुनाबाबत

**(३९) ९१२७७ (०४-०९-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे माजी नगरसेवक नामदेवराव भुइटे यांचा त्यांचे मित्र राजेंद्र दत्तात्रय भिंगे यांनी व त्यांच्या सहका-यांनी मिळुन खून केला असल्याचे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय ,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
सदर प्रकरणी ५ आरोपींविरुध्द मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ९०/२०१७ भा.दं.वि. कलम ३०२, १४३, १४७, १४८, १४९, प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळाल्याने गुन्हयात ५ आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे. सदरचा खटला न्यायप्रविष्ठ आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील पोलीस पाटीलांच्या मागण्यांबाबत**

**(४०) ९१५४० (०४-०९-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस पाटीलांच्या विविध मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील असोसिएशन, महाराष्ट्र राज्य यांनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनात कोणकोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, या मागण्यांसदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनात खालीलप्रमाणे मागण्या करण्यांत आलेल्या आहेत :-

(१) महाराष्ट्र ग्राम पोलिस पाटील अधिनियम, १९६७ मध्ये सुधारणा

(२) पोलिस पाटील पद हे एका विभागाशी संलग्न ठेवणे

(३) दरमहा १०,०००/- रुपये मानधन करणे

(४) वयोमर्यादेत ६० वर्षे वरुन ७० वर्षे वाढ करणे

(५) वैद्यकीय सेवा १०० टक्के लागू करणे

(६) कार्यमुक्त पोलीस पाटलांना दरमहा रु.३०००/-पेन्शन देणे

(७) गांवपातळीवर मंजूर कार्यालयाची पुर्तता करणे

(८) नक्षलवादी जिल्हयात काम करणाऱ्या पोलीस पाटलांना सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे लाभ देणे

(९) राज्यपाल पुरस्कार देणे

(१०) राज्यपाल पुरस्काराची रक्कम रु.२५,०००/- करणे

(३) पोलीस पाटील, कोतवाल, अंगणवाडी सेविका इ. मानसेवी कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याकरीता अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८.०३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये एक अभ्यासगट नेमण्यांत आला आहे. सदर अभ्यासगटाच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्यानंतर पोलीस पाटलांच्या मानधन व अन्य सोयीसवलतींबाबत गृह विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला येथील न्यू तापडिया नगरमध्ये जिल्हा पोलिस अधिक्षकांच्या विशेष पथकाने छापा मारून तीन बडया सट्टा माफियांना अटक केल्याबाबत**

**(४१) ९१८६६ (०४-०९-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील न्यू तापडिया नगरमध्ये जिल्हा पोलिस अधिक्षकांच्या विशेष पथकाने छापा मारून तीन बड्या सट्टा माफियांना अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्याकडून किती मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे,
(३) असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर छाप्यामध्ये आरोपींकडून क्रिकेट सट्टा चालविण्यासाठीचे साहीत्य, वेगवेगळ्या कंपनीचे १५ मोबाईल एकूण किंमत २,३५,१००/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(३) सदर प्रकरणी तीन आरोपींविरूद्ध पोलीस स्टेशन सिव्हील लाईन, अकोला येथे अप.क्र.२२४/१७ कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यात जिंती व जेऊर या दोन ठिकाणी नवीन पोलीस ठाणे सुरु करण्याबाबत

**(४२) ९१९६७ (०४-०९-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा तालुक्यात (जि.सोलापूर) जिंती व जेऊर या दोन ठिकाणी नवीन पोलीस स्टेशनसाठी खाजगी जागा बक्षिसपत्राव्दारे शासनाला दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असे असतानाही दोन्ही ठिकाणी अद्याप पोलीस स्थानक मंजूर करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पोलीस स्थानके सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१७) :**(१) करमाळा तालुक्यातील जेऊर पोलीस ठाण्यासाठी खाजगी जागा बक्षिसपत्राव्दारे शासनाला दिली आहे परंतू जिंती पोलीस ठाण्याकरीता खाजगी जागा बक्षिसपत्राव्दारे शासनाला अद्यापपर्यंत दिलेली नाही.
(२) व (३) पोलीस अधीक्षक सोलापूर (ग्रामीण) यांच्या आस्थापनेवरील पोलीस ठाणे करमाळा अंतर्गत दुरक्षेत्र जेऊर व दुरक्षेत्र जिंतीचे पोलीस ठाण्यामध्ये रुपांतर करणेबाबतचे प्रस्ताव कार्यवाहीधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव (जि.जळगाव) शहरातील प्रमुख चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत.**

**(४३) ९२४५२ (०४-०९-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगाव) शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाढत असलेली वर्दळ व गुन्हेगारीचे प्रमाण पाहता सीसीटीव्ही कॅमेरे लावणे आवश्यक असून यासाठी पोलीस प्रशासनाच्या पुढाकाराने वर्षभरापूर्वी सर्व्हे करण्यात आला होता परंतु त्याठिकाणी एकही कॅमेरा बसविण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या कामासाठी जिल्हा नियोजन मंडळाकडे निधीसाठी प्रस्ताव दाखल करण्यात आल्याची बाब दिनांक १७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देऊन चाळीसगाव शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी शासनाकडून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगाव यांना दि.१८.५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव शहरासह दहा तालुक्यांच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(३) व (४) मा.पालकमंत्री यांनी जिल्ह्यातील १२ तालुक्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रत्येकी रु.१५ लाख याप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्याबाबत व त्यानुसार सदर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार सदर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या ठिकाणांचा सर्वे, कॅमेऱ्यांची संख्या व त्यासाठी आवश्यक निधी या माहितीसह सविस्तर प्रस्ताव तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**ऑनलाइन व्यवहारामुळे सर्वसामान्य नागरीकांस, शेतक-यांस त्रास होत असल्याबाबत.**

**(४४) ९२८४५ (०४-०९-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात कॅशलेस इंडियाच्या माध्यमातून सर्व व्यवहार ऑनलाइन करण्यासाठी मा.पंतप्रधानांनी आवाहन केले असून या ऑनलाइन व्यवहाराचा सर्वसामान्य नागरीकांस, शेतक-यांस फटका बसत असून नाशिक जिल्ह्यातील एका शेतक-यांचे जमीन विक्रीचे २२ लाख ७५ हजार रुपये बँक खात्यातून गहाळ झाले असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतक-याने इंदिरानगर पोलिस ठाण्यात संशयीतांच्या विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील ऑनलाइन प्रक्रिया ही सर्वसामान्य जनतेला व मुख्यत: शेतक-यांसाठी धोकादायक असून त्यांना त्यांचे पैसे परत मिळविण्यासाठी कामधंदा सोडून हालअपेष्टांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर शेतक-याच्या जमीन विक्रीची रक्कम परत मिळण्याबाबत तसेच ऑनलाइनद्वारे बँक खात्यातून पैसे पळविणा-या टोळीवर निर्बंध आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१७)** :(१) व (२) नाशिक येथील शेतकरी जयसिंग लक्ष्मण ढेमसे, रा. पाथर्डीगांव, गौळाणेरोड नाशिक यांनी स्वत: कुठल्याही प्रकारे आनलाईन व्यवहार केलेला नसून त्यांचे रू. ५०,८०,२७४/- आयसीआय बँकेत जमा असताना दिनांक १०.१२.२०१६ ते दि. १०.०४.२०१७ या कालावधीत श्री. ढेमसे यांच्या खात्यावरील रू. २२,७४,०९०/- आरोपीतांनी ऑनलाईन पध्दतीने स्वत: चे खात्यावर ट्रान्सफर करून फसवणूक केली आहे. पोलीस आयुक्तालय नासिक शहर कडील इंदीरानगर पोलीस स्टेशन येथे गु. र. नं. ९९/२०१७ भादंविक ४२०,३४, माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(क),६६ (ड) प्रमाणे दि. २४.०४.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) व (४) सायबर सेलच्या मदतीने बारकाईने तपास करून त्यातील आरोपी अवधेशकुमार सिंग, राज्य बिहार, अतानु अनिलचंद्र चक्रवर्ती, राज्य आसाम, व्यास गुलाब यादव, राज्य बिहार यातील आरोपी क्र. २ व ३ यांना अटक करण्यात आली असून सर्व आरोपींची बँक खाती सिल करण्यात आली आहेत. तसेच त्यांचेकडून रू. ३,५८,९४५/- इतकी रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### श्री मठ संस्थांन (ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग) येथील विश्वस्तांनी केलेल्या नियमबाह्य कारभाराबाबत

**(४५) ९२८९६ (०४-०९-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री मठ संस्थांन (ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग) येथील विश्वस्तांनी सन २००७ ते आजतागायत केलेल्या नियमबाह्य कारभाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे संस्थानाच्या सदस्यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.राज्यमंत्री विधी व न्याय आणि धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने संस्थानाच्या कारभाराची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व तद्नुसार नियमबाह्य कारभार करणाऱ्या सदरहू संस्थानाच्या विश्वस्तांवर शासनाकडून अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी श्री मठ संस्थान, दाभोली, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग या संस्थानच्या सदस्यांनी, संस्थानच्या विश्वस्तांनी केलेल्या नियमबाह्य कारभाराबाबत, सहायक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग यांच्या कार्यालयात चौकशी चालू असून सदर निरीक्षक चौकशी कामी दि.१८.०८.२०१७ रोजी तक्रारदार व विश्वस्त यांना कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत सूचना करण्यात आलेली होती. तद्नुषंगाने विश्वस्तांनी उपस्थित राहून तक्रार अर्जाच्या प्रतीची मागणी करुन आपले म्हणणे पुढील तारखेस देण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार सदर तक्रार अर्जाची पुढील चौकशी दि. २८.०९.२०१७ रोजी होणार आहे.
(३) धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग कार्यालय येथे निरीक्षक चौकशी चालू असून चौकशी लवकरात लवकर पूर्ण करुन प्राप्त चौकशी अहवालावर आवश्यक ती कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.
(४) निरीक्षक चौकशी प्रकरणामध्ये संबंधित पक्षकारांना चौकशीसाठी पुढील तारीख दि.२८.०९.२०१७ दिली असून प्रकरण निरीक्षक चौकशीसाठी प्रलंबित आहे.

---

### पंढरपूर (जि.सोलापूर) येथे चंद्रभागा नदीच्या पवित्र किना-याचा वापर दारु पिण्यासाठी होत असल्याबाबत

**(४६) ९३३७३ (०४-०९-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील चंद्रभागा नदीच्या पवित्र किना-याचा वापर दारु पिण्यासाठी होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे दररोज रात्री किना-यावर ठिकठिकाणी दारु पीत गटागटाने बसलेल्या तरुणांना पाहून वारक-यात तीव्र संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर ठिकाणी दारु पिणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७)** :(१), (२) व (३) हे खरे नाही.

चंद्रभागा नदीचा किनाऱ्यावर विप्रघाट ते नवीन पूल दरम्यान २ पोलीस कर्मचारी नेहमी पेट्रोलिंगसाठी नेमलेले असतात. त्यांना नदीच्या किनारी कोणीही दारु पित असल्याचे आढळून आलेले नाही.

तसेच, चंद्रभागा नदीच्या किनारी पेट्रोलिंग करिता जास्त पोलीस नेमण्याबाबत व नदीच्या किनारी कोणीही दारु पिल्याचे आढळून आल्यास त्यांचेवर गुन्हा दाखल करुन प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत पोलीस निरीक्षक, पंढरपूर यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

**चंद्रपूर (जि.चंद्रपूर) येथे डॉक्टर भावडांनी एका मनोरूग्णाला जबर मारहाण केल्याबाबत**

**(४७) ९३३७४ (०४-०९-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरात कारच्या काचा फोडल्याच्या कारणावरून डॉक्टर भावडांनी एका मनोरूग्णाला हॉकी स्टिकने जबर मारहाण केल्या प्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात दिनांक १७ जुन, २०१७ रोजी वा त्या सुमारास तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर डॉक्टर भावडांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी फिर्यादीचे वडीलांना(मानसिक रूग्ण) दोन डॉक्टरांनी पायावर व डोक्यावर मारून जखमी केले अशी माहीती फिर्यादींना मिळाल्यावरून फिर्यादीचे तोंडी तक्रारीवरून पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद स्टे. डा. सा. ना. क्रमांक ६५/१७, दिनांक १६.६.२०१७ रोजी घेण्यात आली.

सदर प्रकरणी तक्रारदार यांनी जखमीला मारपीट होताना पाहीलेले नाही तसेच तक्रारदार यांनी दिनांक ३.७.२०१७ रोजी शपथपत्राद्वारे स्पष्ट केले की, दिनांक २४.४.२०१७ रोजी जखमी यांना वेडेपणाचा झटका आल्याने ते घराच्या बाहेर पडले. जखमीस दोन डॉक्टरांनी मारल्याचे तक्रारदारांना काही लोकांनी सांगितले होते. तथापि जखमीला डॉक्टरांनी मारताना कोणीही पाहीले नाही. तक्रार ही गैरसमजुतीनी दिली होती. सदरच्या तक्रार अर्जावर आता कोणतीही कार्यवाही करायची नाही असे स्पष्ट सांगितले आहे.

सबब, जखमीस झालेल्या जखमा या पागलपणात रोडवरील दगडावर पडल्याने झाल्या असाव्यात असे चौकशीत निष्पन्न झाल्याने चौकशीचे संपुर्ण कागदपत्रे पोलीस स्टेशन अभिलेखावर दप्तरी दाखल करून भविष्यात डॉक्टरांविरूद्ध तक्रार प्राप्त झाल्यास डॉक्टरांविरूद्ध कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर चौढवे गावाजवळ (ता.महाड, जि.रायगड) कार आणि आराम बस यांच्यात झालेला भीषण अपघात**

**(४८) ९३६६९ (०४-०९-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर चौढवे गावाजवळ (ता.महाड, जि.रायगड) कार आणि आराम बस यांच्यात दिनांक ८ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघातात एकाच कुटुंबातील ५ जण गंभीर जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अपघातात जखमी झालेल्यांना शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१७) :**(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर चौढवे गांवाजवळ (ता.महाड, जि.रायगड) दिनांक ८ जून, २०१७ रोजी कार व मिनी बस यांच्यात भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे.

(२), (३) व (४) दिनांक ०८.०६.२०१७ रोजी सायं.६.४५ चे सुमारास मुंबईहून गोव्याच्या दिशेने जात असलेल्या मिनी बसचालकाचा मौ.चौंढवे गांवाचे हददीत (ता.महाड) भरधाव वेगाने बस चालवित असल्याने बसवरील ताबा सुटल्याने समोरुन येणाऱ्या कारला धडक मारुन अपघात केला. यामध्ये कारमधीलन दोन जण मृत्युमुखी पडले असून तीन जणांना गंभीर दुखापती झाल्या आहेत.

सदर अपघाताबाबत महाडा एमआयडीसी पोलीस ठाणे, येथे गु.र.क्र. ४६/२०१७, भा.दं.वि. कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, ४२७ मो.वा.का. कलम १८४ नुसार दाखल करण्यांत आला आहे.

सदर गुन्हयातील मिनी बस चालक यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यांत आला असून त्यास दिनांक ०९.०६.२०१७ रोजी अटक करण्यांत आली आहे. आरोपीस दिनांक ०९.०६.२०१७ रोजी न्यायालयीन कोठडी मिळून दिनांक ०९.०६.२०१७ रोजी जामीन मंजूर करण्यांत आला आहे.

नुकसान भरपाई मिळणेकामी मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, यांचेकडे दिनांक ०१.०७.२०१७ नुसार कागदपत्रे दाखल करण्यांत आलेली आहेत. प्रकरणाची पुढील चौकशी चालू असून आरोपीविरुध्द लवकरच मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यांत येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**यवतमाळ जिल्ह्यातील पुसद उपविभागाचे विभाजन करून उमरखेड येथे नविन उपविभागीय कार्यालय निर्माण करणेबाबत**

**(४९) ९३७६९ (०४-०९-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील पुसद उपविभागाचे विभाजन करून उमरखेड येथे नविन उपविभागीय कार्यालय निर्माण करण्याबाबतचे पत्र कक्ष अधिकारी, गृहविभाग, मंत्रालय यांनी दिनांक २८ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पोलिस प्रशासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१७) :**(१) व (२) प्रस्तुत प्रकरणी दिनांक २८ जून,२०१७ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून अतिरिक्त माहिती मागविण्यात आली होती. त्यानुषंगाने पोलीस महासंचालक यांनी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद उपविभागाचे विभाजन करुन उमरखेड येथे नविन उपविभागीय कार्यालय निर्माण करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव शासनास सादर केली होता. सदर प्रस्तावास गृह विभाग शासन निर्णय दिनांक २५.०७.२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**त्र्यंबकेश्वर तालुक्यातील (जि.नाशिक) ग्रामीण भागात अनेक अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(५०) ९३९४९ (०४-०९-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर तालुक्यातील (जि.नाशिक) ग्रामीण भागात अनेक ठिकाणी स्थानिक पोलीस प्रशासनाच्या संगनमताने दारु, जुगार इ. अवैध धंदे सुरु असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथिल अवैध धंदे चालविणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) त्र्यंबकेश्वर तालुक्यात जानेवारी ते जुन दरम्यान अवैध दारु विक्री करणाऱ्यांवर १८ गुन्हे दाखल करुन, त्यामध्ये १८ आरोपींवर कारवाई करुन त्यांच्याकडून एकूण ४१,६७१/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच, जुगार सदराखाली ३ गुन्ह्यात १४ आरोपींविरुध्द कारवाई करुन त्यांच्याकडून एकूण ८,५४,१२५/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यात चोरुन लपून चालणाऱ्या अवैध धंद्यांवर छापे टाकूण कायदेशीर कारवाई करण्याबाबत प्रभारी अधिकारी यांना सक्त सुचना देण्यात आलेल्या आहे. तसेच, अवैध धंदे करणाऱ्यांवर पोलीस ठाणे व खास पथकामार्फत कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.